उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड. पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216
ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in

**तातडीचे**

विषयः- **वन जमिन रायगड**
भूमिगत वीज तार टाकण्यासाठी व वीज उपकेंद्राच्या बांधकामासाठी घारापूरी बेट (एलिफंटा लेणी), ता. उरण, रायगड येथील 0.1772 हेक्टर राखीव वनक्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वळती करणेबाबत.

जावक क्र. ब/20/जमिन/ 4046 /2017-18.
अलिबाग – 402 201, दिनांकः- 01 /01/2018.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विदुयत वितरण कं. लि.,
भिंगारी, पो. ता. पनवेल,
पनवेल, रायगड.

संदर्भः- शासन आदेश क्र. एफएलडी-1317/प्र.क्र.438/फ-10 दिनांक 30/12/2017.

भूमिगत वीज तार टाकण्यासाठी व वीज उपकेंद्राच्या बांधकामासाठी घारापूरी बेट (एलिफंटा लेणी), ता. उरण, रायगड येथील 0.1772 हेक्टर राखीव वनक्षेत्र मागणी प्रस्तावास संदर्भीय महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचे संदर्भीय पत्रान्वये तत्वतः मंजुरी काही अटी व शर्तीचे अधीन राहून प्रदान केली आहे. सोबत सदर पत्राची प्रत जोडली आहे.

तरी शासन निर्णयाप्रमाणेखालील प्रमाणे अटींची पूर्तता करणेत यावी.

**अट क्र. 1 -** वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

**अट क्र. 2 –** वळते होणारे क्षेत्राचे मोबदल्यांत करावयाचे 1.00 हेक्टर अवनत वनक्षेत्रावर वनीकरण योजना राबविणेची आहे. पर्यायी वनीकरणासाठी रेडी रेक्नर दराप्रमाणे सन 2017-18 या वर्षासाठी प्रति हेक्टरी दराने रक्कम रु. 4,96,523/- (चार लाख शहाण्णव हजार पाचशे तेवीस) मात्र भरणे आवश्यक आहे. त्यानुसार भरणा करणेत यावी. **सदर रक्कम ई-चलन जनरेट करुन भरणा करणेत यावी.**

**अट क्र. 3 –**प्रस्तावामध्ये 1 हेक्टर अवनत वनक्षेत्र उपलब्ध करुन देणेत आलेले आहे. तथापी सदर अटी नुसार दुप्पट अवनत वनक्षेत्रावर दंडनीय वनीकरणासाठी अधिकची रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे दंडनीय वनीकरणांतर्गत 0.50 हेक्टरसाठी (सन 2017-18 वर्षासासाठी प्रति हेक्टरी 4,96,523/- प्रमाणे) रक्कम रु. 2,48,262/- (दोन लाख अठ्ठेचाळीस

हजार दोनशे बासष्ठ) मात्र भरणा करणेत यावी. **सदर रक्कम ई-चलन जनरेट करुन भरणा करणेत यावी.**

**अट क्र. 4 -** ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वन जमिनीचा वापर करता येणार नाही.

**अट क्र. 5 –** सदर अटी नुसार नक्त वर्तमान मुल्य दर रक्कम रु. 7,30,000/- प्रति हेक्टर प्रमाणे वळलेकरण होणारे वनक्षेत्र 0.1772 हे. यासाठी रक्कम रु. 1,29,356/-(एक लाख एकोणतीस हजार तीनशे छप्पन) मात्र एवढी भरणा करावी लागेल. **सदर रक्कम ई-चलन जनरेट करुन भरणा करणेत यावी.**

**अट क्र. 6 –** सदर अटी नुसार केंद्रशासनाचे सुधारीत सुचनांनुसार सुधारीत दराने नक्त वर्तमान मुल्याची रक्कम भरण्यास तयार असलेबाबतचे हमीपत्र देण्यात यावे.

**अट क्र. 7 –** या अटी नुसार वनक्षेत्रांत प्रस्तावीत कामे करतेवेळी मजुर व इतर कर्मचारी यांचेकडून वनक्षेत्रातील वनस्पती व प्राणी यांना हानी पोहोचणार नाही याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

**अट क्र. 8 -** प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक मंजुरीची आवश्यकता असल्यास ती प्राप्त करून घेणेची जबाबदारी यंत्रणेची राहील, त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**अट क्र. 9 –** शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक आहे.

**अट क्र. 10 –** विवीध अधिनियम व त्याअंतर्गत तयार केलेले नियम व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची आहे.

वरील प्रमाणे पर्यायी वनीकरण योजना, दंडनीय पर्यायी वनीकरण योजना व नक्त वर्तमान मुल्य या रकमेचा भरणा www.forestclearance.nic.in या संकेत स्थळावर लॉगईन करुन चलन जनरेट करुन भरणा करता येईल. भरणा केलेल्या चलनाची प्रत व अट निहाय पुर्तता अहवाल आवश्यक हमीपत्रांसह (Undertakings) **सहा प्रतीत** या कार्यालयास सादर करावा ही विनंती. उक्त अटींची पूर्तता केलेनंतर राज्य शासनाकडून अंतीम मंजूरी प्रदान करण्यात येईल व त्यानंतरच शासनाचे सुचनांप्रमाणे प्रत्यक्ष जमिन वर्ग करणेची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपणाकडून सदर तत्वतः मंजूरी पत्रांतील अटीची पूर्तता केलेनंतर याबाबतचा पुर्तता अहवाल शासनास सादर करणे शक्य होईल.

उप वनसंरक्षक,
अलिबाग. करिता
1/1/2018

प्रतिलिपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांना माहितीस सादर.

प्रतिलिपी:- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रत:- सहा. वनसंरक्षक, पनवेल व वनक्षेत्रपाल उरण यांचेकडे माहिती व जरुरी कार्यवाहीस रवाना.